● शनिवार, दि. १४ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १३६ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ जालन्यात रास्ता रोको

## आंबेडकरी समाज-संघटनांचे आंदोलन; घोषणाबाजीने परिसर दणाणला

**जालना । प्रतिनिधी -** निषेधार्थ जालना येथील परभणी येथील घटनेच्या आंबेडकरी संघटना व समाजाच्यावतीने अंबड चौफुली परिसरात शुक्रवार (दि १३) रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. प्रसंगी समाजबांधवांच्यावतीने देण्यात आलेल्या घोषणाबाजीने परिसर दाणाणून गेला होता. यावेळी प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

शहरातील अंबड चौफुली येथील जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. पोलीस प्रशासनाने आंदोलनकर्त्यांची समजून घातल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

यासंदर्भात प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून या निवेदनात म्हटले आहे की, परभणी येथे संविधान प्रतिकृतीची विटंबना करण्यात आलेली आहे. ही घटना अत्यंत निंदणीय आणि निषेधार्थ आहे. या प्रकरणी ज्या व्यक्तीने संविधान प्रतिकृतीची विटंबना केली होती, त्यास पकडून चोप दिला होता, त्याचप्रमाणे त्यांचे विरूध्द पोलीस मध्ये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

या प्रकरणी परभणी येथील संविधान प्रेमी आंबेडकरवादी जनतेला पोलीस प्रशासनाचे वतीने जे अन्यायकारक प्रकार घडले आहेत ज्यामध्ये वस्ती वस्तीमध्ये जाऊन जनतेस मारहाण करून त्यांना पकडून पोलीस स्टेशनला नेत आहेत तरी ही कृती अत्यंत चुकीची आहे त्याचा आम्ही जालनावासी तर्फे जाहिर निषेध करीत आहोत.

परभणी येथील पोलीस प्रशासनास तात्काळ जनतेस पकडून मारहाण करणे आणि विनाकारण गुन्हे नोंद करणे हे प्रकार तात्काळ थांबवावेत अन्यथा या बाबत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उद्रेक झाल्याशिवाय राहणार याची नोंद घ्यावी, त्या बाबतची संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील असा ईशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. याप्रसंगी ब्रह्मानंद चव्हाण, माजी आ. कैलास गोरंट्याल, दिनकर घेवंदे, कपिल खरात, संदीप खरात, सुनील साळवे, महेंद्र रत्नपारखे, काशिनाथ मगरे, बापू साळवे, संदीप साळवे, संतोष लहाने, विकास लहाने, सुनील रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, प्रेमानंद मगरे, आनंद म्हस्के, योगेश रत्नपारखे, सचिन कांबळे, जितेंद्र उघडे, किशोर बोरुडे, विशाल वाघमारे, अशोक साबळे, हरीश रत्नपारखे यांच्यासह शेकडो भीमसैनिक व महिला पदाधिकारी समाजबांधवांसह व आंबेडकर प्रेमींची उपस्थिती होती.

यावेळी कोणतीही अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांच्या मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



### ‘त्या’ पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करा - गोरंट्याल



परभणी येथे घडलेली घटना निषेधार्ह असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी दिली आहे. परभणी येथील आंदोलनकर्त्यांवर लाठी हल्ला करणाऱ्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी त्यांनी शुक्रवार (दि १३) रोजी रास्ता रोको आंदोलनादरम्यान माध्यमांशी बोलतांना दिली. लाठी हल्ला करणाऱ्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल न केल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील गोरंट्याल यांनी दिला.

---

युवा आदर्श

### दत्ता...

कृपा करी दिगबरां
दत्तात्रेया दत्तात्रेया
भवसागर तव कृपे
पार करतो लीलया
अहम् मना साठला
षड्रिपुने पीडे काया
सत्यकळे कर जुळे
जगावरी तव माया
कृपा करी मजवरी
नको बा मोहमाया
पाप कर्म होई धर्म
सारे आयुष्य वाया
चमत्कारे भुले सारे
दावीरे तव किमया
तुझे स्थान अढळ
मनमंदीर देवालया
तेवत राहो भक्तीने
डोळ्यांच्या समया
वैखरी वश तुजला
स्तोत्र श्लोक गाया
स्वर्गसुख तव मुख
नंदनवन दत्त पाया
तवदृष्टी सुखी सृष्टी
च्चिदानंद चिन्मया
पाऊल पडे वाकुडे
देव राया करी दया
पापभिरु करी मज
जीवन हवे निर्भया

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

---

# भारतीय संविधानाचा अवमान करणाऱ्या वर देशद्रोहाचा खटला दाखल करा

## सामाजिक समता संघर्ष समिती व संविधान संवाद समिती च्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक समता संघर्ष समिती व संविधान संवाद समितीच्या वतीने शुक्रवार (दि.१३) रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत परभणी येथील घडलेल्या संविधान प्रतिकृतीच्या विटंबने संदर्भात निषेध व्यक्त करत निवेदन देण्यात आले.

या निवेदनात म्हटले की परभणी येथील रेल्वे स्टेशन रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर असलेल्या संविधान प्रतिकृतीचा अवमान काही समाजकंटकांनी केला आहे. या घटनेवरून अवमान करणाऱ्याची मनुवादी मानसिकता किती संविधान विरोधी आहे हे लक्षात येते त्या व्यक्तीला संविधानाप्रती प्रचंड घृणा आहे असं लक्षात येत आहे. आपला देश हा संविधानावर चालतो संविधानाचे मूल्य, तत्त्व या गोष्टी प्रत्येक नागरिकांनी आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे पण आज सत्तेमध्ये ज्या मानसिकतेचे लोक बसलेले आहेत यावरून लक्षात येते आहे की येत्या काळामध्ये संविधानामध्ये किती मोठ्या प्रमाणात छेडछाड होण्याची शक्यता आहे. एकीकडे राज्यामध्ये राज्य सरकार 'घर घर संविधान' ही संकल्प राबवण्याचा विचार करत असताना अशा घटना घडणे अत्यंत निंदनीय आहे यामुळे समाजात दुही माजवण्याचा प्रयत्न होतोय का ? हा प्रश्न उभा राहत आहे. म्हणून संबंधित व्यक्तीवर देशद्रोहाचा खटला दाखल करावा अशी मागणी सामाजिक समता संघर्ष समिती व संविधान संवाद समिती च्या वतीने करण्यात येत आहे. आणि यापुढे अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत याची काळजी घेण्याच्या दृष्टीने यंत्रणा उभी करण्यात यावी त्याचबरोबर संविधानाचे मूल्य जनमाणसात कसे रुजवता येतील याचाही सरकार स्तरावरून प्रयत्न व्हावा. यावेळी सामाजिक कार्यकर्ते

ॲड. शिवाजी आदमाने, अफसर मिर्झा, ज्ञानोबा वरवडे, डॉ. विजय कुमठेकर, डॉ.मारोती तेगमपुरे, प्रा. राजक्रांती वलसे, वैशाली सरदार, वनिता आठवले, प्रदीप घाटेशाही, ॲड. अनिल मिसाळ, संजय येळवंते, सय्यद फरखुंद अली, शेख फिरोज, नाना पवार, सिध्दार्थ जाधव, बाबासाहेब पाटोळे, राहुल हनवते, संघरत्न शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते रस्त्यांच्या कामांचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** शहर नगर पालिका हद्दीत भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजने अंतर्गत आ. अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नांतून ६७.00 कोटीं रुपयांची विकास कामे मंजुर झाली आहे. या कामापैकी चार कामांचा शुभारंभ शनिवार (दि १४) रोजी अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडीतराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.

मंजूर कामांपैकी शनिवार (दि. १४) रोजी सकाळी ११ वाजता श्रीजी हॉटेल मंठा चौफुली, ११. ३0 रेल्वे स्टेशन जवळ, १२ वाजता सुंदर नगर चंदनझीरा, १२. ३0 वा. पेशवा चौक जुना जालना या ठिकाणी उदघाटन सोहळा संपन्न होणार आहे. यामध्ये अंदाजीत ३.४९ कोटी रुपयांचा आय टी आय पाण्याची टाकी ते माराती मंदिर चौक १८.00 मी रुंद रस्ता, अंदाजीत रक्कम २.५0 कोटी रुपयांचा रेल्वे गेट ते मॉ किराणा १५.00 मी रुंद विकास योजना रस्ता, अंदाजित रक्कम १.१0 कोटी रुपयांचा पेशवे चौक ते लक्कडकोट पुलापर्यंत १२.00 मी. रुद विकास योजना रस्ता, अंदाजित रक्कम २.0६ कोटी रुपयांचा श्रीजी ढाबा ते शकुंतला नगर पर्यंत १५.00 मी. रुंद विकास योजना रस्ता आदी कामांचा समावेश करण्यात आला आहे.



या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन जालना शहर महानगर पालिकेचे शहर अभियंता सय्यद सऊद, उपायुक्त नंदा गायकवाड, आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांनी केले आहे.

---

# शतप्रतिशत मतदान करणाऱ्या सकल जैन समाजातील ८ कुटुंबांना पारितोषिक



**जालना । प्रतिनिधी -** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत शतप्रतिशत मतदानासाठी सकल जैन समाजाच्यावतीने समाजातील कुटुंबासाठी अनोखा उपक्रम राबविण्यात आला. कुटुंबियांनी शंभर टक्के मतदान करून, व्हाट्सअपवर कुटुंबियासह असलेला **पान ३ वर**

---



जालना शहर
महानगरपालिका, जालना
भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत
मा. आमदार श्री अर्जुनरावजी खोतकर यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर एकूण ६७.00 कोटी रुपयाच्या विकास योजनेतील कामापैकी



| अ.क्र. | काम व ठिकाण | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | आय टी आय पाण्याची टाकी ते मारोती मंदीर चौक १८.00 मी. रुंद विकास योजना रस्ता | रु. ३.४९ कोटी |
| २. | रेल्वे गेट ते माँ किराणा १५.00 मी. रुंद विकास योजना रस्ता | रु. २.५0 कोटी |
| ३. | पेशवे चौक ते लक्कडकोट पुलापर्यंत १२.00 मी. रुंद विकास योजना रस्ता | रु. १.१0 कोटी |
| ४. | श्रीजी ढाबा ते शकुंतलानगर पर्यंत १५.00 मी. रुंद विकास योजना रस्ता | रु. २.0६ कोटी |

कामांचा उदघाटन सोहळा
मा. आमदार श्री अर्जुनरावजी खोतकर
(विधानसभा सदस्य, जालना) यांचे शुभहस्ते व
अभिमन्यू खोतकर, युवा सेना सचिव
पंडीतराव भुतेकर, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख
भाऊसाहेब घुगे, शिवसेना जिल्हाप्रमुख
गणेश सुपारकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख
विष्णू पाचफुले, शिवसेना शहरप्रमुख
आत्मानंद भक्त, शिवसेना शहरप्रमुख
यांच्या प्रमुख उपस्थितीत
शनिवार, दिनांक १४.१२.२०२४ रोजी संपन्न होत आहे.
विनीत
सय्यद सऊद, शहर अभियंता
नंदा गायकवाड, उपायुक्त
संतोष खांडेकर, आयुक्त तथा प्रशासक
सौजन्य : शुभम कन्स्ट्रक्शन जालना,
मे. एस.जी. देविदान ईन्फ्रा प्रा. लि. जालना.,मे. विजय आदमाने जालना.

# संपादकीय पान

## महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज पुण्यतिथी. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काही काळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# रुग्णांची संजीवनी; मंगेश चिवटे

प्रार्थनेसाठी जोडणाऱ्या दोन हातापेक्षा मदतीसाठी पुढे आलेला एक हात चांगला असतो अशी निःस्वार्थ समाज सेवेची एक ओळख सांगितली जाते. सतत हसतमुख राहत जनतेच्या सुख दुःखात सहभागी होत रात्री-अपरात्री मदतीचा हात असाच नेहमी पुढे करणारा अवलिया म्हणून मंगेश चिवटे यांची ओळख महाराष्ट्राला गेल्या अडीच वर्षात झाली आहे. अगदी सोमवारी रात्री झालेल्या कुर्ला बस अपघातानंतरही मंगेश चिवटे तातडीने कामाला लागल्याचे दिसून आले होते. मंगेश चिवटे यांनी रुग्णालयात जाऊन कुर्ला अपघात प्रकरणातील जखमींची विचारपूस केली होती. महाड-चिपळूण - इरसाळ वाडी पूरग्रस्तांसाठी तातडीने धावून जाणे अशा अनेक प्रसंगामुळे मंगेश चिवटे यांनी स्वतःचेही एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

मंगेश चिवटे हे पूर्वाश्रमीचे पत्रकार आहेत. त्यांनी मुंबईत अनेक वृत्तवाहिन्यांसाठी वार्ताहार म्हणून काम केलं आहे. मुंबईत आल्यानंतर सुरुवातीच्या काळात चिवटे यांनी स्टार माझा, जय महाराष्ट्र वृत्तवाहिनी, साम टी व्ही, आय बी एन लोकमत या वाहिन्यांमध्ये विविध पदांवर काम केले. सुमारे २०० हून अधिक नेत्यांच्या मुलाखती घेतल्या. २६/११ रोजीच्या मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ल्याच्या थरारक प्रसंगाचे त्यांनी ताज हॉटेलच्या येथून कव्हरेज केले होते. नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर पाक अतिरेक्यांचा हल्ला झाला, हॉटेल ताज जवळ फायरिंग चालली होती. देशाच्या राजधानीत झालेल्या या घटनेचे गांभीर्य आणि भयानकता देशवासींयाना माहिती व्हावी आणि त्याने परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सजग व्हावे यासाठी मंगेशने बेडरपणे...जीवाची पर्वा न करता त्याचे वृत्त लाईव्ह पद्धतीने देशवासीयांसमोर आणीत होते. तो दिवस मला आजही आठवतो आहे. सामाजिक भान असलेली त्यांची पत्रकारिता अनुभवल्यानंतर.... गेल्या काही वर्षांपासून गोरगरीब आणि दीनदुबळ्यांच्यासाठी सामाजिक दृष्टीकोनातून सतत राबणारे मंगेश चिवटे आणि चेहऱ्यावर सतत हसू आणि अंगी असलेल्या नम्रतेने तुमची दिवसरात्र चाललेली धडपड सुद्धा मी पाहत आहे. तसंच काही काळ चिवटे यांनी दिल्लीतही पत्रकारिता केली आहे. वास्तवात हेच खरे त्यांच्या साहसीवृत्तीचं द्योतक होय. पत्रकार म्हणून काम करत असतानाच मंगेश चिवटे यांनी गोरगरीब रुग्णांसाठी काम करण्यास सुरुवात केली होती. या कामाला शासकीय यंत्रणेची ताकद मिळावी, या हेतूने चिवटे यांनी २०१५ साली तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची मूळ संकल्पना मांडली. राज्यातील गरजू रुग्णांना मदत करण्याच्या हेतून सरकारच्या माध्यमातून हा कक्ष उभा राहिला तर लाखो गरजवंतांना आर्थिक मदत मिळेल हे फडणवीस यांच्या लक्षात आल्यानंतर व मंगेश चिवटे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे काही महिन्यांनंतर ही संकल्पना पूर्णत्वास आली आणि या कक्षाच्या माध्यमातून राज्यभरातील लाखो गरीब आणि अडल्या-नडलेल्या रुग्णांना आर्थिक मदत मिळू लागली. उद्धवसाहेब ठाकरे यांची सत्ता आल्यानंतर शिवसेना भवन येथूनही काही काळ हे काम सुरु होते, महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद पडलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष त्यानंतर शिवसेनेचे मुख्य नेते आणि तत्कालीन मंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना करून या कक्षाच्या प्रमुखपदाची जबाबदारी घेत कामाला सुरुवात केली. मनात रुग्णसेवेचं वेड असलेल्या चिवटे यांनी ठाण्यातून सुरू झालेला शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष अल्पावधीतच राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला. दरम्यान, राज्यात २०२२ मध्ये झालेल्या ऐतिहासिक सत्तांतरानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदी विराजमान होताच मंगेश चिवटे यांच्यावर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची जबाबदारी सोपवली. कोरोनाच्या काळात त्यांनी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडली होती. यावेळी त्यांनी असंख्य गरजूंना मदत केली होती. त्यांची ही धडपड, तळमळ, प्रामाणिकपणा आणि संवादाची शैली पाहूनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगेश चिवटे यांच्यावर विश्वास टाकला आणि ही योजना अधिक व्यापककरण्यासाठी त्यांना विशेष कार्य अधिकाऱ्याचा दर्जा दिला.

एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना जनसामान्यांचा नेता म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण होण्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाचा मोठा वाटा होता. वैद्यकीय सहायता कक्षातील त्यांनी केलेल्या रुग्ण स्नेही कामाचा मी स्वतः साक्षीदार आहे. त्यांच्या कामाची ओळख करून घेण्यासाठी मी स्वतःहा मंत्र्यालायातील त्यांच्या केबिनमध्ये बसून अवलोकन केले आहे. थोडा मागोवा घेतल्यानंतर असे लक्षात आले की, एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात व मंगेश चिवटे यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता मदत कक्षाचा विस्तार तळागाळात पोहोचला होता.



माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्याबाबत, व्यक्तिमत्वाबाबत कार्यपद्धतीबाबत आणि त्यांचे एकूणच राज्यकारभार बाबत कितीही मतभेद असले तरी त्यांच्या वैद्यकीय सहाय्यता निधीबद्दल मात्र राज्यभरामध्ये कमालीची कृतज्ञता आहे. कोणी खोक्याची उपमा देते, कोणी गद्दाराची उपमा देते. अनेक लोकांना ते पटते तर अनेक लोकांना त्यांची बाजू सत्याची वाटते. या सगळ्या संमिश्र प्रतिक्रियांमध्ये सध्या जनभावना आहेत. परंतु त्यांच्या वैद्यकीय सेवेच्या मदती संदर्भात मात्र प्रत्येकाची एक वाक्यात आहे. गरजवंतांना आधार देत प्रत्येकाच्या आरोग्याचे रक्षण करणारा हितसंवर्धक म्हणून एकनाथ शिंदे यांचे कार्य उत्तुंग आहे, गेल्या पन्नास वर्षात कुठल्याही मुख्यमंत्र्याचे वैद्यकीय उपचारासंदर्भामध्ये इतके कार्य झाले नसेल इतके महान कार्य यानिमित्ताने घडत आहे.

सत्ताबदल झाला की, राज्याला जसा नवा मुख्यमंत्री मिळतो तसे नवीन मंत्रीमंडळ मिळते. मंत्र्यांना नवीन बंगले मिळतात आणि बंगल्याना नवीन रंगरंगोटीसह नवीन फर्निचर मिळते. असेच काही मंगेशरावांच्या बाबतीत घडले. राज्याला नवीन मुख्यमंत्री म्हणून फडणवीस साहेब आल्यानंतर आरोग्य सहाय्यता कक्षातलं मंगेश चिवटे यांचं काम आज संपुष्टात आले आहे. महाराष्ट्राच्या सत्ताकारणात सत्ताधाऱ्यांच्या मर्जीतले असे राजकारण १९८५ नंतर घडत आले आहे. पूर्वी दिल्लीश्वरांच्या मर्जीने राज्याराज्यातले राजकारण वा सत्तासंघर्ष होत असत. परंतु पुढे आघाड्या - युतींचे दिवस आल्यानंतर हा माझा तो माझ्याजवळ आणि हा तुझा तो बाहेर असे दिवस आले आहेत. चिवटे यांच्याबाबतीत असेच घडणार होते, ते याला अपवाद कसे असणार होते. पण गेल्या काही वर्षांमध्ये लाखो रुग्णांना एका फोनवर, मेसेजवर थेट मदत करण्याचं काम अत्यंत मनापासून करण्यात मंगेश यांनी कसर ठेवली नव्हती. कधीही फोन केला तर ते उपलब्ध असत. कधी बिझी असेल थोड्या वेळाने त्यांचा फोन येत असे किंवा दुसऱ्या मिनिटाला त्याच्या टीममधील लोक तत्परतेनं फोन करुन प्रश्न मार्गी लावत होते. रुग्ण कोण आहे? किंवा काय यापेक्षा त्याला तातडीची मदत कशी पोहोचेल यासाठी त्यानं अटोकाट प्रयत्न असायचा. काही नियम आडवे आले तर मदतीचे अन्य मार्ग शोधले. रुग्ण आपल्याच कुटुंबातील व्यक्ती आहे या भावनेनं त्यानं काम केलं. माणसांना पदं मिळतात, पण ती शंभर टक्के कशी लोकसेवेसाठी वापरता येतात, ते मंगेशनं दाखवलं. आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने गेल्या २ वर्ष २ महिन्यामध्ये ४०,००० हून अधिक गोरगरीय-गरजू रुग्णांना एकूण ३२१ कोटी रूपयांची आर्थिक मदत वितरित केली आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्णसेवेत उत्कृष्ट कामगिरी करून राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरायम आरोग्याचा प्रकाश आणला आहे. या योजनेमुळे अनेक रुग्णांना अक्षरशः जीवनदान मिळत असल्याने ही योजना आता महाराष्ट्र राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना ठरत आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीला पुन्हा एकदा महाराष्ट्रात यापूर्वी केव्हाही मिळाले नव्हते एवढे बहुमत मिळले आहे त्यामध्ये तळागाळात पोहोचलेल्या या कामाचा सुद्धा सिहाचा वाट आहे हे नाकारून चालणार नाही.

रुग्णदूत या नात्याने मंगेश चिवटे यांची ओळख झाल्यानंतर त्यांच्यासोबत माझे मैत्रीचे नाते निर्माण झाले. आमच्या मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या व्यासपीठावर कार्यक्रमाच्या निमित्ताने मंगेशजींचे येणे झाले. विशेष म्हणजे मला आणि मंगेश चिवटे यांना २०२२ मध्ये पत्रकारितेसाठी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराने घोषित झाला. बाळशास्त्रींच्या पोंभुर्ले या जन्मगावी लोकमतचे संपादक वसंतराव भोसले यांच्या हस्ते आमच्या दोघांचा सत्कार झाला होता. त्यावेळी आम्ही दोघेही सहकुटुंब कोकणात उपस्थित होते. मंगेश यांचा जन्म १५ जून १९८८ रोजी स्वातंत्र्य सेनानी साथी मनोहरपंत चिवटे (आजोबा) यांच्या देशप्रेमी घराण्यात झाला. तर त्यांचे वडील पत्रकार आहेत. मंगेश चिवटे यांची शालेय जीवनापासूनच एक हुशार विद्यार्थी म्हणून करमाळा येथील महात्मा गांधी विद्यालयात ओळख असायची, त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या एस.पी. कॉलेज मध्ये झाले. त्यांनी मराठी विषयात एम.ए. करून नंतर बी.एड. केलं. याशिवाय चिवटे यांनी पत्रकारिता विषयात पदवी संपादन केली. छंद म्हणून ते गड किल्ल्यांचा प्रवास करत आतापर्यंत चिवटेनी ५० गड किल्ल्यांना भेटी दिल्या असून, पन्हाळगड ते पावनखिंड हा प्रवास ते गेल्या १० वर्षांपासून सातत्याने करत आहेत.

द्वेष, मत्सर, निंदा, हव्यास, स्वार्थ आणि कटुता यांचे समिकरण आता अलीकडच्या भारतीय राजकारणाचा स्थायीभाव बनला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात शुद्ध विचाराचे आणि शुद्ध आचाराचे राजकारण आज संपून गेले असून राजकारणातील आसुया ही आता राजकारणाचे मुख्य सूत्र बनली आहे. पण याच राजकारणाच्या प्रांगणात जेव्हा केव्हा राजकारणविरहित प्रेमाची, करुणेची आणि गरजेची आस निर्माण होत असते तेव्हा या राजकारणाला मंगेश चिवटे यांच्या रूपाने पायाभूत असे माणुसकीचे झरे स्वभावतःच निर्माण होत असतात. जीवा-भावाच्या नात्यागोत्यापेक्षा आणि हितचिंतक आणि स्नेह यांच्यापेक्षाही पुढे जाऊन जेव्हा माणुसकीचा पाझर फुटत असतो तेव्हा ते व्यक्तीमत्व प्रामाणिक माणुसकीचे एक उदाहरण बनत असते. मंगेशराव आज तुम्ही हा 'कक्ष' सोडला असला, तरी तुम्ही केलेलं काम सामान्य माणसाच्या कायम स्मरणात राहील..! या माणसाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता खऱ्या अर्थानं घराघरात पोहचवली. हे करत असताना ना कोणाची जात पाहिली, ना कुणाचा धर्म, ना कोण कुठून बोलतोय, ना कोण कोणाच्या मार्फत आलाय. तुमच्या कामामुळे हजारो कुटुंब आयुष्यभर तुमचे ऋणी राहतील. मुख्यमंत्री सहायता कक्ष या विभागाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाणाऱ्या 'मंगेश चिवटे' नावाच्या माणसाच्या कामाला सलाम...!

**- रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**

# त्रिदेवस्वरूप भगवान दत्तात्रय

आपल्या भारतीय हिंदू संस्कृतीमध्ये भगवान दत्तात्रयांना खूप महत्व आहे.विशेष करून महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये भगवान दत्तात्रेयांना मानणारा खूप मोठा वर्ग आहे.भगवान दत्तात्रयांच्या अवतारांच्या शक्तीची जाणीव करून देणारी जागृत मंदिरे महाराष्ट्रात तसेच कर्नाटकात आहेत.भगवान दत्तात्रयांचे अवतार श्रीपाद श्री वल्लभ, स्वामी नृसिंह सरस्वती महाराज, श्री स्वामी समर्थ, अंश अवतार श्री वासुदेवानंद सरस्वती टेम्भे महाराज,दत्त चिले महाराज.तसेच सिध्द दत्तस्थान मंदिरे कुरवपूर, पिठापूर, कर्दळीवन, गाणगापूर, नृसिंहवाडी, औदुंबर, अक्कलकोट इत्यादी.

मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर श्री दत्त महाराजांचा जन्म झाला,म्हणून त्या दिवशी दत्त जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो.पूर्वीच्या काळी भूतलावर स्थूल व सूक्ष्म रूपांत आसुरी शक्ती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या त्यांना दैत्य म्हटले जात असे.देवगणांनी त्या आसुरी शक्तींना नष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न असफल झाले.तेव्हा ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया रूपांत दत्त देवतेला अवतार घ्यावा लागला. त्यानंतर दैत्य नष्ट झाले.तो दिवस ऋदत्तजयंती' म्हणून साजरा करतात.दत्तजयंतीचे महत्त्व असे की दत्तजयंतीला दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते.या दिवशी दत्ताची मनोभावे उपासना केल्यास दत्ततत्त्वाचा जास्तीत जास्त लाभ मिळण्यास मदत होते.या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे.यालाच गुरुचरित्रसप्ताह असे म्हणतात.यावेळी दत्तमंदिरामध्ये भजन,कीर्तनादी कार्यक्रम आयोजीत केले जातात.दत्तगुरूंची पूजा,धूप,दीप व आरती करून सुंठवड्याचा प्रसाद वाटप करतात.दत्ताच्या हातातील कमंडलू व जपमाळ ब्रह्मदेवाचे प्रतीक आहे.शंख व चक्र विष्णूचे आणि त्रिशूळ व डमरू शंकराचे प्रतीक आहे.महाराष्ट्रात औदुंबर,नरसोबाची वाडी,गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवाला विशेष महत्त्व असते.दत्तजन्म कथा दत्तात्रय हा शब्द 'दत्त' व 'आत्रेय' अशा दोन शब्दांनी बनला आहे.'दत्त' या शब्दाचा अर्थ आपण ब्रह्मच आहोत,मुक्तच आहोत,आत्माच आहोत,अशी निर्गुणाची अनुभूती ज्याला आहे असा.आणि 'अत्रेय' म्हणजे अत्री ऋषींचा मुलगा. श्री दत्तात्रयाच्या जन्माविषयी विविध कथा प्रचलित आहेत.मात्र या सगळ्या कथांमधून श्रीदत्त हे अत्रीऋषी व माता अनुसूया यांचा पुत्र व विष्णूचा अवतार आहे,असाच बोध होतो.अत्रीऋषींनी पुत्रप्राप्तीसाठी ऋक्ष कुलपर्वतावर घोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपाने सारे त्रिभुवन पोळून निघाले.अत्रीऋषींच्या या प्रखर तपाने संतुष्ट होऊन ब्रह्मा-विष्णु-महेश हे तिन्ही देव प्रकट झाले.आणि त्यांनी अत्रीऋषींना तपाचे कारण विचारले. अत्रीऋषींनी त्यांना विनवले की,आपण माझ्या उदरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा.तिन्ही देवांनी त्यांची विनंती मान्य केली.देवत्रयीच्या आशीर्वादाने अनुक्रमे ब्रह्मापासून सोम म्हणजे चंद्र,विष्णूपासून दत्त आणि शिवापासून दुर्वास हे तीन पुत्र अनुसयेच्या उदरी जन्मला आली.श्रीदत्तजन्माची एक कथा ब्राह्मणपुराणात आहे.अत्रीऋषींनी ब्रह्मा-विष्णु-महेश यांची पुत्रप्राप्तीसाठी आराधना केली.ते संतुष्ट झाल्यावर त्यांनी देवांना विनवले की,आपण माझ्या घरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा आणि मला एक रूपवती कन्याही प्राप्त व्हावी. देवांच्या आशीर्वादाने दत्रात्रेय,सोम,दुर्वास हे तीन पुत्र आणि शुभात्रेयी नावाची कन्या अत्रीऋषींना प्राप्त झाली.याचबरोबर दत्तात्रेयांच्या जन्माची आणखी एक कथा प्रसिद्ध आहे.ती अशी की,राहूने सूर्याला ग्रस्त केले असता सर्व पृथ्वी अंधःकारमय झाली.अत्रीने सूर्याला राहूच्या मगरमिठीतून सोडवले आणि पुन्हा पृथ्वी प्रकाशमान केली.अत्रीच्या या महत्कार्यामुळे संतुष्ट झालेल्या शिव व विष्णु यांनी अनुक्रमे दुर्वास आणि दत्त यांच्या रूपाने अत्रीच्या घरी जन्म घेतला.भारतात शैव,वैष्णव आणि शाक्त हे तीन प्रमुख पंथ आहेत. ती सुमारे हजार ते बाराशे वर्षांपासून श्री दत्तात्रयाची उपासना करत आहेत. संपूर्ण भारतात विशेषतः महाराष्ट्रात श्रीदत्त आराधणेची उज्ज्वल परंपरा आहे.भगवान दत्तात्रयांचे तीन मुखी रूप सर्वच ठिकाणी प्रचलित आहे कारण त्यांना ब्रह्मा विष्णू आणि महेशाचे रूप मानले जाते.परंतु भरपूर ठिकाणी एक मुखी दत्तांची भक्ती केली जाते.महाराष्ट्रात नारायणपूर (पुणे) येथे एक मुखी दत्त आहेत.भगवान दत्तात्रयांनी दीन दुबळ्यांची सेवा करण्याचे अखंड कार्य केले.भारतीय हिंदू संस्कृतीचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी भारत भ्रमण केले आणि ठिकठिकाणी गादी स्थापन केली.महानुभाव संप्रदाय,नाथ संप्रदाय,वारकरी संप्रदाय,समर्थ संप्रदाय व दत्त संप्रदाय ही पाच संप्रदाय श्री दत्तप्रभुची उपासना करताना दिसतात.श्री दत्त संप्रदायातील साधक 'अवधूतचिंतन श्री गुरूदेव दत्त' असा जयघोष करत असतात.अवधूत हे दत्तात्रयाचे नाव असून या शब्दाचा अर्थ म्हणजे- नेहमी आनंदात रमणारा,प्रत्येक क्षण वर्तमानकाळात जगणारा होय.श्री दत्ताच्या पाठीमागे असलेली गाय म्हणजे पृथ्वी व चार श्वान म्हणजे चार वेदांचे प्रतीक आहे.श्री दत्तगुरूंनी पृथ्वीला आपले गुरु मानले होते.पृथ्वीप्रमाणे सहनशील व सहिष्णु असावे,अशी तिच्याकडून त्यांनी शिकवण घेतली होती.तसेच त्यांनी अग्नीला गुरु माणून आपला देह हा क्षणभंगूर आहे,अशी शिकवण त्यांनी अग्नीच्या ज्वालेपासून घेतली होती.अशाप्रकारे चराचरातील प्रत्येक वस्तूत परमेश्वराचे अस्तित्व आहे.ते पाहण्यासाठी श्रीदत्तगुरूंनी चोवीस गुरु केले होते.श्री दत्त दररोज खूप भ्रमण करीत असत.ते स्नानासाठी वाराणसीला,चंदनाची उटी लावायला प्रयागला जात,तर दुपारची भिक्षा कोल्हापूरला मागत व दुपारचे जेवण पांचाळेश्वर,बीड जिल्हा येथे गोदावरीच्या पात्रात घेत असत.तांबुलभक्षणासाठी मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात राक्षसभुवन येथे जात,तर प्रवचन व कीर्तन ऐकण्यासाठी नैमिष्यारण्यात बिहार येथे पोहोचत. निद्रेसाठी मात्र माहूरगडावर जात व योग गिरनार येथे करीत असता.गुजरात मधील गिरनार पर्वत हे भगवान दत्तात्रयांचे प्रमुख शक्ती स्थान मानले जाते.श्री दत्त अवलिये होते.क्षणात कोठेही अंतर्धान पावत असत.श्री कृष्णांच्या लीलाप्रमाणेच श्रीदत्तात्रयाच्या लीला आहे.'श्रीपाद श्रीवल्लभ' हा दत्ताचा पहिला अवतार,'श्री नृसिंह सरस्वती' हा दुसरा तर 'स्वामी समर्थ हा तिसरा अवतार आहे. सर्वांना दत्त जयंतीच्या भक्तीमय शुभेच्छा.!



**- केतन दत्ताराम भोज**
**- कार्यकारिणी सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई**

## नियमित व्यायाम करणे गरजेचे - संजय देशपांडे

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील पोलीस स्टेशन मध्ये कर्तव्य करत असलेले संजय देशपांडे यांचा फिटनेस फंडा पाहिला मिळाला खरं तर येरवी व्यायाम म्हणलं काही लोकांना आजही आळस होतो पण शरीरासाठी आवश्यक आहे व्यायाम केल्याने माणसाचा दिवस चांगला जातो कुठला आळस होत नाही व्यायाम हा शरीरासाठी आवश्यक आहे माझे वजन ९२ किलो झाले होते मी आता सध्याला व्यायाम करून ७६ किलोवर आलेलो आहे आणि ७० किलोच्या खाली मी वजन आणणार आहे व्यायाम केल्याने फिटनेस व्यवस्थित राहतो आपल्याला दम लागत नाही चालताना व इतर बरेच फायदे होतात. कुठल्याही प्रॉडक्ट काही न घेता फक्त चालणे आणि धावणे या दोन गोष्टी वरच माझे वजन मी ९२ चे ७६ किलो वर आलेल आहे आणि दररोज किमान सहा किलोमीटर पर्यंत चांगले आणि धावणे होत असल्याची टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे संदीप देशपांडे यांनी सांगितले आहे.



# ७७ लाखांचा गुटखा जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** मानवी आरोग्यास घातक असलेला ७७ लाख ११ हजार २०० रुपयांचा प्रतिबंधीत गुटखा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जालना जिल्ह्यात अवैध गुटखा वाहतुक व विक्री करणारे संबंधी माहिती घेऊन कारवाई करण्याच्या सूचना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पथकास दिल्या होत्या. यावरुन पोलीस निरीक्षक पंकज जाधव स्थागुशा जालना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी स्थागुशाचे वेगवेगळे पथक तयार करुन कारवाई करण्या बाबत म ार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने शुक्रवार (दि १३) रोजी रात्री ०१.१० वाजता पोलीस ठाणे तालुका जालना हद्दीत कडवंची शिवारात समृध्दी महामार्गावर स्थानिक गुन्हे शाखा जालना येथील पथक हे पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना एक संशयित कंटेनर समृध्दी महामार्गाने मेहकर कडून छत्रपती संभाजीनगर कडे जात असल्याचे दिसले. पथकातील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी सदर कंटेनर थांबवून कंटेनर चालकाकडे विचारपुस केली असता, त्याने प्रथम उडवा उडवीचे उत्तरे दिली. त्यास अधिक विश्वासात घेऊन विचारपुस केल्यानंतर कंटेनर मध्ये गुटखा असल्याचे सांगितले. पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कंटेनर चालकास कंटेनरसह ताब्यात घेऊन पाहणी केली. त्या कंटेनरमध्ये एकुण १८० पोतंमध्ये ७७,११,२००/- रुपये किंमती मानवी आरोग्यास घातक असलेला प्रतिबंधीत असलेला बाजीराव सुगंधी पान मसाला गुटखा व टॅब्याकोचे पॉकिटे व २५ लाख



रुपये किंमतीचे कंटेनरसह जप्त केले असुन कंटेनर चालक इरफान रहीम सय्यद वय ३६ वर्षे, रा. पुंडलिक नगर हुसेन कॉलनी गल्ली नं ५ छत्रपती संभाजीनगर व इतर दोन असे एकुण तीन आरोपीतांविरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना येथे पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांचे म ार्गदर्शनाखाली पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, योगेश उबाळे सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस हवालदार सॅम्युअल कांबळे, राम पव्हरे, प्रशांत लोखंडे, सागर बाविस्कर, योगेश सहाने, धीरज भोसले, सोपान क्षीरसागर, चालक सौरभ मुळे स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.


## शिंगोना शाळेने लगातार ६वर्ष केंद्रात दोन्ही गटात प्रथम क्रमांक पटकावला



**परतूर । प्रतिनिधी.-** दि.१३ डिसेंबर २०२४ रोजी केंद्र स्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धेत जिं. प. प्रा. शा. सिंगोना या शाळेने १ ते ५ व ६ ते ८ गटात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यात १ ते ५ मध्ये धनश्री कदम, प्रज्ञा गरड व तनुजा मुळे ह्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.६ ते ८ मध्ये ऋतूजा सोळंके, प्रणिता गरड व राहुल डंबाळे ह्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशासाठी विद्यार्थ्यांना प्रमुख मार्गदर्शन राजु सावंत यांनी केले .व विद्यार्थ्यांना सहकार्य, ज्ञानोबा लहाने, मॅडमअमृता सोईतकर ,मॅडम आम्रपाली ससाणे, मॅडम, सुचिता कुलकर्णी, यांचे लाभले.२०१९ ते २०२४ पर्यंत शिंगोना शाळेने लगातार ६ वर्ष केंद्रात दोन्ही गटात १२ शाळेतून प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान प्राप्त केला आहे. शाळेचे मुख्याध्यापक चिंतामणी, काकडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या यशाबद्दल सम स्त शिक्षक वृंद व गावकरी मंडळी यांनी त्यांच्या यशाचे कौतुक केले.केंद्रप्रमुख तरवटे, यांनी प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

## मुद्रेगाव येथे श्री दत्त जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताह

**घनसावंगी । प्रतिनिधी -** तालुक्यातील मुद्रेगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह भावार्थ रामायण श्री गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रामकथा प्रवक्ते विठ्ठल महाराज राऊत दिगंबर देव कुलकर्णी जालिंदर महाराज राऊत हे राहणार आहेत



अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात श्री स्वामी बालकानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात श्री ह भ प महारुद्र महाराज पवार श्री ह भ प रामकृष्ण महाराज काळे श्री ह भ प सचिन आबा लावणी कर श्री ह भ प दिगंबर महाराज माळोदे श्री ह भ प सिताराम महाराज रोडगे श्री ह भ प सतीश महाराज बनकर श्री ह भ प वासुदेव महाराज काल्याचे कीर्तनकार श्री ह भ प वासुदेवदास महाराज यांचे कीर्तन होईल नंतर महाप्रसाद होईल महाप्रसादाचे अन्नदाते श्री अशोक रामविलास लोया किसान मशनरी जालना दत्त जयंतीनिमित्त सकाळी १० ते १२ नंतर महाप्रसाद होईल आपल्या आगमनापर्यंत सर्व पंचक्रोशीतील व गावकऱ्यांनी अवश्य लाभ घ्यावा

## टेंभुर्णी जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळातील मुलांनी घेतला सहलीचा आनंद

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची निसर्ग सहल बुधवारी काढण्यात आली. गावापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या त्रिकुटा माता मंदिर परिसरातील निसर्गरम्य वातावरणात ही सहल नेण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी निसर्गासोबत खेळण्याचाही मनसोक्त आनंद घेतला.

याठिकाणी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी देखील सहलीचा मनसोक्त आनंद घेतला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसोबत सहभाग घेतला.

केंद्रप्रमुख राम खराडे यांच्या मार्गदर्शनात मुख्याध्यापक अशोक हरकळ, दिलीप आढे, गणेश देशपांडे, रमेश शेळके, भगवान सानप, आनंद माने, शुभम मोरे, शिक्षिका मीरा पायघन, प्रणिता आव्हाळे आदींनी पुढाकार घेतला.

विद्यार्थ्यांना शाळेच्या चार भिंती बाहेरही बरेच काही शिकायला मिळते. शालेय विद्यार्थी हे बिन भिंतीच्या शाळेतही रमले पाहिजेत, यासाठी दरवर्षी आम्ही हिवाळ्यात एक दिवस विद्यार्थ्यांना निसर्ग सहलीच्या माध्यमातून निसर्गाच्या सानिध्यात घेऊन जातो. याठिकाणी विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने निसर्गाशी हितगुज केले. निसर्गातून मिळालेले ज्ञान त्यांच्या कायम स्म रणात राहते अशी प्रतिक्रिया शिक्षीका मीरा पायघन यांनी दिली.

निसर्ग सहलीत आम्ही सर्व विद्यार्थी मनसोक्त निसर्गासोबत खेळलो. यावेळी झाडावरील आंबट बोरे चाखण्याची मजा आम्ही घेतली. वेगवेगळ्या झाडांची पाने गोळा केली. दररोजच्या शाळेपेक्षा आजचा दिवस आमच्यासाठी खूप वेगळा होता. शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकत्रित केलेले वन भोजन खूप आनंद देऊन गेले. निसर्गाच्या सानिध्यात वेळ कधी संपला हे देखील कळले नाही. असे विद्यार्थीनी राजेश्वरी इंगळे हिने म्हटले आहे.

## लिंगायत हटगर कोष्टी समाज जालना तर्फे 'आमची गुणी मुलं प्रतिष्ठान' संस्थेच्या नोंदणी क्रमांकाचे अनावरण




**जालना । प्रतिनिधी -** लिंगायत हटगर कोष्टी समाजा तर्फे जालन्यातील अधिकारी वर्गाकडून नोंदणी क्रमांकाचे अनावरण व वधू वर नोंदणी अर्ज चे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी व्हि ए चेके (उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग), प्रमुख पाहुणे संतोष बुरकुले (वनपरीमंडळ अधिकारी परतूर तालुका), विजय कुमार चिंधे (डायरेक्टर कलश सिड्स जालना), किशोर घनचक्कर (डेप्युटी पोस्ट मास्तर जालना पोस्ट ऑफिस) हे होते.

या छोटेखानी कार्यक्रमात सम ाजातील स्थानिक समाज बांधवांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

यावेळी आयोजकांच्या वतीने प्रम ुख पाहुण्यांचे शाल श्रिफळ व पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.

'आमची गुणी मुलं प्रतिष्ठान' चे सर्वांनी भरभरून कौतुक केले,व वेळोवेळी आपल्या समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रम साठी स्थानिक समाज बांधवांनी स्वेच्छेने,स्फुर्तीने आर्थिक योगदान दिले.

यावेळी जालना कोष्टी समाजातील प्रतिष्ठानचे पदाधिकारी व स्थानिक सम ाज बांधव ज्ञानेश्वर रुद्राक्ष सर, चंद्रकांत आप्पा वांगे, राजूभाऊ वाळेकर, अनंत ओगले, सोमनाथ वांगे, लक्ष्मण जेवरे, सुर्यकांत आप्पा रूद्राक्ष, विजय लंगोरे, दिगंबर बार्शीकर, किशोर वांगे, चिंचोलकर, गणेश आप्पा परळकर, देवकर बजरंग दुरूळे, हरजुळे , चिंचोले, देविदास बुरकुले,व ईतर सम ाज बांधव उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी सौ.रंजिता वांगे,सौ.अनिता ओगले,सौ.उमा वांगे,सौ.शोभा वांगे ,सौ.पद्मिनी रुद्राक्ष सौ.शेवलकर,सौ.संगिता बुरकुले,सौ. कमलबाई वांगे, सौ.वर्षा वांगे,श्रीम ती कावेराबाई सिनगारे यांच्यासह महीलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.अशोक सिनगारे यांनी मांडले. अतिशय सुंदर नियोजन व खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन ज्ञानेश्वर रुद्राक्ष सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सोमनाथ वांगे यांनी केले.

## क्रीडा सप्ताहानिमित्त क्रीडा स्पर्धा व उपक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जालना जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने व जालना जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने येत्या १८ डिसेंबर २०२४ या पर्यंत क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा सप्ताहात विविध खेळांचे प्रदर्शनिय सामने, रोल स्केटींग स्पर्धा, भारतीय पारंपरिक व्यायाम प्रकाराचे प्रदर्शन, चालणे स्पर्धा, फुटबॉल तसेच क्रीडा क्षेत्रातील नामवंत खेळाडूच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना यांच्याशी संपर्क साधावा.

पान १ व ४ वरुन

### शतप्रतिशत मतदान ...

फोटो पाठवायचे होता. या उपक्रमाला प्रतिसाद देत कुटुंबियांनी ही मोहीम यशस्वी ठरविली. सोडत पद्धतीने ८ भाग्यवान कुटुंबाची निवड करण्यात आली असून, रविवार दि. १५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता गुरु गणेश भवनमध्ये आयोजित कार्यक्रमात त्यांना बक्षीस प्रदान करण्यात येणार आहे.

सकल जैन समाजाने एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम राबवून मतदानाबाबत नवीन आदर्श निर्माण केला आहे. समाजातील १०० टक्के मतदान होण्यासाठी एक अनोखा प्रयोग राबवला. या उपक्रमासाठी सुदेश सकलेचा, माणिकचंद कासलीवाल, संजय लव्हाड़े, विरेंद्र रूणवाल, विजय जैन, अजीत छाबड़ा दिनेश बरलोटा प्रेमचंद कासलीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष वॉर रूम तयार करण्यात आली होती. समाजातील प्रत्येक कुटुंबाने मतदान करावे, यासाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. समाजाच्या या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, समाजाने तब्बल ९१ टक्के मतदानाचा टप्पा पार केला. या उपक्रमाच्या माध्यमातून इतरांना प्रेरणा देणारा आदर्श सकाळ जैन समाजाने निर्माण केला आहे.

या उपक्रमासाठी विजय बाफना यांच्यावतीने ५१०० रुपयांचे प्रथम, कचरूलाल पाटणी, योगेश पाटणी, दीपेशकुमार पाटणी यांच्यावतीने ३१०० रुपयांचे द्वितीय, गौतम चंद श्रीश्रीमाल यांच्यावतीने २१०० रुपयांचे तृतीय, सुशीलकुमार बेगानी यांच्यावतीने ११०० रुपयांचे चतुर्थ तर संतोष मुथा यांच्यावतीने भगवान महावीर यांची प्रतिमा असलेले चांदीचे चार शिक्के याप्रमाणे एकूण आठ बक्षिसे ठेवण्यात आली होती. या पुरस्काराचे मानकरी अनुक्रमे सज्जन लुणिया, सुरेश जांगड़ा, महावीर पहाडे, महावीर चंडालिया, विपुल रायसोनी, विजय बाफना, सुनिल चोरडिया रविंद्र संचेती कुटुंब ठरले आहे.

प्रसंगी दीपेश पाटणी, प्रतिक बेगानी, संजय लव्हाडे, विरेंद्र रूणवाल, विजय जैन, दिनेश बरलोटा, अजीत छाबड़ा, मनोज मुथा, संकेत देसरडा, अक्षय सोनटक्के, प्रेमचंद लोढ़ा, विकास जैन, महेश बोरा, महावीर रूणवाल, संदीप ललवानी, गौतम छल्लानी, चिराग बाफना, प्रवीण पहाड़े, ईश्वर धारीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

### मतदारसंघातील विकासकामांना ...

नाही त्यामुळे काम करताना दर्जेदार काम करणे अपेक्षित आहे कामाच्या बाबतीत कुठलेही कंत्राटदराला सूट द्यायची नाही कंत्राटदार कुणीही असो काम दर्जेदार करून घ्यायचे अशा स्पष्ट सूचना यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिल्या

कृषी विभागाचा आढावा सादर करताना तालुका कृषी अधिकारी यांनी विविध योजना आमदार लोणीकर यांच्यासमोर मांडल्या प्रसंगी कृषीविभागाच्या विविध कल्याणकारी योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यासंदर्भात कृषी विभागाने पुढाकार घ्यावा व अधिकाधिक योजना शेतकरी बांधवांपर्यंत कशा पोहोचवता येतील यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना केली. परतुर विधानसभा मतदारसंघातील अनेक विकास कामे प्रगतीपथावर असून मध्यंतरी निवडणूक कालावधीत ही सर्व कामे बंद पडली होती त्या कामांना गती देणे अपेक्षित असून अर्धवट राहिलेली सर्व कामे तात्काळ पूर्ण करण्यासंदर्भात योग्य ती पावले उचलावीत. त्यात कुठलीही कुचुराई सहन केली जाणार नाही असेही आमदार बबनराव लोणीकरांनी यावेळी स्पष्ट केले

आजच्या या आढावा बैठकीदरम्यान गटविकास अधिकाऱ्यांसह ग्रामपंचायत अधिकारी हे देखील उपस्थित होते प्रसंगी आमदार बबनराव लोणीकरांच्या सूचनेप्रमाणे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी आपापल्या ग्रामपंचायत मध्ये १७३ गाव किंवा ९५ गाव वॉटर ग्रीड योजनेचे पाणी सुरू झाले आहे किंवा नाही याबाबतची लेखी माहिती देण्यासंदर्भात सूचना केली होती त्यानुसार गटविकास अधिकारी श्री गगनबोने यांनी केवळ २४ गावांम ध्ये पाणी पोहोचले असल्याची माहिती लेखी स्वरूपात आमदार बबनराव लोणीकर यांना दिली त्यामुळे हा सूर्य आणि हा जयद्रथ अशी अवस्था खोटी माहिती देणारे अधिकाऱ्यांची झाली हाराष्ट्र जीवन प्राधिकार्यांच्या अधिकाऱ्यांनी ६४ गावांमध्ये पाणी पोहोचले असल्याची खोटी माहिती दिली होती त्याचा सोक्षमोक्ष आमदार बबनराव लोणीकरांनी आढावा बैठकीदरम्यान समोरासमोर घेतला. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनंतर आपण दिलेली माहिती खोटी असल्याची कबुली अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. प्रसंगी आमदार बबनराव लोणीकरांनी या भ्रष्ट अधिकाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. शासनाचा पैशाचा अपव्यय करणाऱ्या आणि लाखो लोकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या अधिकाऱ्यांना तुरुंगाची वारी करावी लागणार असल्याचे सूतोवाच देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिले

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून व तत्कालीन ऊर्जामंत्री व विद्यमान मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारान परतुर विधानसभा मतदारसंघात प्रत्येक गावामध्ये नवीन ट्रांसफार्मर व विजेच्या नवीन तारा व विजेचे खांब उभारणीचे काम सुरू असून ते काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी देखील आमदार बबनराव लोणीकरांनी वीज वितरण अधिकाऱ्यांना तसेच इन्फ्राच्या अधिकाऱ्यांना सूचना केली यावेळी इन्फ्राच्या अधिकाऱ्यांनी डांबरीकरण रस्त्याच्या लगत कुठेही विजेच्या खांबांची उभारणी न करता पुढील ५० वर्ष ही योजना टिकली पाहिजे यासाठी योग्य ती पावले उचलावीत कुठलीही अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी अशा प्रकारच्या सूचना यावेळी दिल्या.

यावेळी पंचायत व महसूल विभागाला सूचना करताना आमदार बबनराव लोणीकर यनी सांगितले की परतुर विधानसभा मतदारसंघात १५ हजार पेक्षा अधिक घरकुल मंजूर आहेत त्या घरकुलांना लागणारी वाळू मोफत देण्याचे धोरण शासनाचे असून या सर्व घरकुलांना वाळू उपलब्ध करून देण्याची जबाबदारी तहसीलदार व गटविकास अधिकारी यांची आहे त्या संदर्भात लाभार्थ्यांनी गटविकास अधिकारी किंवा तहसीलदारांकडे या संदर्भात वाळूची मागणी करणे अपेक्षित आहे त्याचप्रमाणे ज्या सार्वजनिक विकास काम ांना वाळूची आवश्यकता आहे त्याच्या विभागाच्या विभाग प्रमुखांनी देखील तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरुपात मागणी केल्यास आवश्यक तेवढी वाळू उपलब्ध करून दिली जाईल हे करत असताना तहसीलदार आणि पोलीस प्रशासनाने वाळू चोरी करणाऱ्या लोकां संदर्भात कठोर पावले उचलावीत अशी सूचना देखील यावेळी केली

लघुपाटबंधारे विभागाच्या वतीने कोल्हापुरी बंधारे बांधण्या संदर्भाने तात्काळ कार्यारंभ आदेश काढून येत्या आठवड्याभरात कामांना सुरुवात करावी अशा सूचना केल्या यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद मुख्यमंत्री ग्रामसडक योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ नगरपंचायत निम्न दुधना प्रकल्प पंचायत विभाग कृषी विभाग गटशिक्षणाधिकारी आरोग्य विभाग लघु पाटबंधारे विभाग एकात्मिक बाल विकास विभाग यांच्यासह राष्ट्रीयकृत्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा व्यवस्थापकांकडून केलेल्या कामाचा आढावा घेतला

यावेळी गणेशराव खवणे अंकुशराव बोराडे सतीशराव निर्मळ पंजाबराव बोराडे राजेश मोरे नागेशराव घारे कैलासराव बोराडे तहसीलदार सोनाली जोंधळे गटविकास अधिकारी संतोष गगनबोने ज्ञानेश्वर सरकटे दीपक बोराडे कैलास चव्हाण शेषनारायण दवणे नवनाथ खंदारे रामकिसन बोडके दत्तात्रय कांगणे अमोल मोरे मुस्तफा पठाण विठ्ठलराव काळे आबासाहेब सरकटे गजानन देशमुख दारासिंग चव्हाण पंजाबराव पुणेकर सोपानराव वायाळ विठ्ठलराव कदम बाळासाहेब कौर बाळासाहेब वांजोळकर आनंद जाधव प्रसाद राव गडदे आदित्य केंदळे प्रदीप चाटे पवन केंदळे श्री राम राठोड राजेभाऊ खराबे गणेशराव चव्हाण किशोर हनवते तौफिक कुरेशी सोपानराव खरात बंडू नाना खरात पोपटराव खंदारे महादेव वायाळ उमेश वायाळ आदिनाथ काकडे मनोज देशमुख बाळासाहेब इंगळे अमोल चव्हाण संदीप खंदारे शंकर बंडगे बळीराम कवळे ज्ञानेश्वर पवार भानुदास नानवटे शिवशंकर डोईफोडे बाबाराव गुंड जानकीराम चव्हाण गुलाब राठोड नामदेव जाधव अंकुशराव राठोड वसंतराव बागल प्रल्हादराव चाळक शरद मोरे विवेक काकडे सुनील कांगणे आत्माराम जाधव तानाजी शेंडगे भगवान देशमुख सुरेश वाडेकर नरेंद्र ताठे बाबाजी जाधव जगदीश जाधव विनोद जाधव अभिजीत गोदंडे प्रकाश मुळे परमेश्वर शिंदे सूर्यकांत जाधव दिगंबर बोराडे सुभाषराव बागल श्रीरंग देशमुख प्रकाश मोरे पांडुरंग काळे भागवत पोटे सिद्धेश्वर सरकटे दिनेश सराफ संजय गायकवाड प्रकाशराव गडदे प्रमोद बोराडे जितेंद्र सरकटे नितीन चव्हाण रमेश वायाळ नितीन साठे दत्तात्रय खराबे राजेश मस्के राजेभाऊ डेंगळे सुदर्शन देशमुख सचिन राठोड प्रशांत राठोड अशोक बोराडे कैलासराव केंदळे यांच्यासह सर्वच शासकीय विभागांचे विभाग प्रमुख कार्यकारी अभियंता उपअभियंता शाखा अभियंता विविध अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खोटी माहिती दिली असल्याची आढावा बैठकीदरम्यान अधिकाऱ्यांची कबुली; आमदार लोणीकरांनी काढली भ्रष्ट अधिकाऱ्यांची खरडपट्टी

# मतदारसंघातील विकास कामांना गती द्या; अर्धवट कामे तात्काळ पूर्ण करा, त्यात दिरंगाई सहन करणार नाही - आमदार लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघातील १७३ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर ग्रेड भौतिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या पूर्ण झाली असल्याचा खोटा अहवाल केंद्र व राज्य सरकारला सादर करत शासनाची दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांना आपण कदापि माफ करणार नसून त्यांनी दोन लाख लोकांच्या तोंडचे पाणी पळवले आहे त्यामुळे त्यांना तुरुंगाची वारी करावी लागणार असा स्पष्ट इशारा माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आढावा बैठकीदरम्यान दिला.

तहसील कार्यालय मंठा येथे आज माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामांचे आढावा बैठक पार पडली या बैठकीदरम्यान आमदार लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की १७३ गाव वॉटर ग्रीड व ९५ वॉटर ग्रीड या अत्यंत महत्त्वकांक्षी योजना असून परतुर विधानसभा मतदारसंघातील पाच लाख लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न या वॉटर ग्रीड मुळे संपुष्टात येणार आहे असे असताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अध्यक्ष अभियंता कार्यकारी अभियंता उपअभियंता शाखा अभियंता यांनी संबंधित कंत्राटदराशी संगणमत करून आर्थिक गैरव्यवहार करत ही योजना पूर्ण झाली असल्याचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे ही पूर्णपणे शासनाची फसवणूक असून गावात पाणी पोहोचले नसेल तर योजना पूर्ण कशी काय होऊ शकते असा सवाल देखील यावेळी आमदार लोणीकर यांनी उपस्थित केला. विहिरीवरून जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलशुद्धीकरण केंद्रापासून जल कुंभापर्यंत आणि जल कुंभा पासून पाण्याच्या टाकीपर्यंत जर हायड्रोलिक टेस्ट करण्यात आलीच नाही त्याचबरोबर जर गावागावातील पाण्याच्या टाक्या बांधकाम पूर्ण झालेले नाही शासनाकडे खोटा अहवाल सादर करण्याच्या तारखेपर्यंत एकाही गावांमध्ये पिण्याचे पाणी मिळालेले नसताना योजना भौतिक दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या पूर्ण कशी होऊ शकते असा सवाल देखील आमदार लोणीकर यांनी यावेळी उपस्थित केला

पुढे बोलताना लोणीकर म्हणाले की १७३ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर ग्रील या दोन्ही योजना पूर्ण झाल्यानंतर संबंधित कंत्राटदाराने तीन वर्षे ही योजना चालवायची आहे त्यानंतर या योजनेचे पूर्ण बिल अदा करणे बाबत शासनाचे निर्देश असताना अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार करत भ्रष्टाचार करून संबंधित कंत्रालदाराला पूर्ण बिल दिलेले आहे ही बाब अत्यंत गंभीर आणि कुठल्याही परिस्थितीत माफ करणे योग्य नाही त्यामुळे शासनाला खोटी माहिती देणाऱ्या कंत्राटदाराशी संगणमत करून आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या आणि लाखो लोकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना तुरुंगाची वारी करावी लागणार तसेच संबंधित कंत्राटदराला काळ्या यादीत टाकून शासनासह सर्वसामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या कंत्राटदरावर भाऊ जरी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल अशा शब्दात आमदार बबनराव लोणीकर यांनी अधिकाऱ्यांना सुनावले




परतुर विधानसभा मतदारसंघात सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यासह वीज वितरण अंतर्गत विविध विकास कामे सुरू आहेत ती विकास कामे निर्धारित वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे देखील लोणीकरांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, कुठलाही कंत्राटदार माझा नातेवाईक नाही किंवा माझ्या जवळचा किंवा लांबचा नाही कोणीही माझा उजवा हात किंवा डावा हात पान ३ वर




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.